किंमत रु. १५/-

पालकनीती

पालकत्वाला वाहिलेले मासिक

वर्ष १४ • अंक ९ • १६ जानेवारी २०१५

पा ल क नी ती

पालकत्वाला वाहिलेले मासिक

संपादक
संजीवनी कुलकर्णी

संपादक मंडळ
प्रकाश अनभूले
मधुरा राजवंशी
वसीम मणेर
सोमीनाथ घोरपडे
नीला आपटे
मंजिरी निंबकर

मुखपृष्ठ व अंक मांडणी
वसीम मणेर
मधुरा राजवंशी

मुखपृष्ठ
इंदू हरिकुमार

रेखाटने
वसीम मणेर

अक्षरजुळणी
स्वाती जामदार

जानेवारी ते डिसेंबर २०१५ साठी वर्गणी रु.२००

वर्गणीचा चेक / ड्राफ्ट 'पालकनीती परिवार' या नावाने काढावा.

संपर्क :
पालकनीती परिवार,
प्रगत शिक्षण संस्था
रिंग रोड, लक्ष्मीनगर,
फलटण ४१५५२३
०२१६६ २२३०४१
psspalakneeti@gmail.com
www.palakneeti.org

पालकनीती परिवाराचे प्रकाशन
वर्ष १४ वे अंक ९ वा
१६ जानेवारी २०१५

लेखांत व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावीत.

या अंकात

- **होलपडणारी पावलं** – रुपाली सुभाष फरांदे
- **छेद अंधाराला** – सेवा रामचंद्र गडकरी – शब्दांकन – सोमीनाथ घोरपडे
- **बाबा झोरो** – मंजिरी निंबकर
- **एका बापाचा प्रवास** – प्रकाश अनभूले
- **बा म्हणतु** – प्रकाश अनभूले
- **मॉमी!!!** – मधुरा राजवंशी
- **तुमच्यासारखे वडील पायजेल होते!** – भाऊसाहेब चासकर
- **पन्नास कारण की...** – वाल्मिक चव्हाण
- **विचार करून पाहू – बालशिक्षणाबद्दल काही नवे** – नीलिमा गोखले
- **शिकतं घर आणि बाबा** – नीला आपटे
- **शहाणी वेबपाने – मॉर्निंग जॅम विथ माय लिल् मॅन** – नीलिमा गोखले, मधुरा राजवंशी

मुखपृष्ठाविषयी...

छोट्या प्रियांकाला झोप येत नसे तेव्हा बाबा तिला कडेवर घेऊन बागेत जात आणि भसाड्या आवाजात एक आसामी अंगाई गीत गात. बाबांचा घाम, त्यांच्या तोंडाला येणारा सिगरेट-व्हिस्कीचा वास आणि बागेतल्या रातराणीचा सुगंध अशा मिश्र वासांच्या संगतीत प्रियांका गाढ झोपून जाई.

वडिलांच्या स्पर्शाबद्दलची ही प्रियांकाची शेवटची आठवण आहे. आपल्या समाजाच्या एका विशिष्ट घडणीमुळे आपल्या मुलींबद्दलचं प्रेम स्पर्शातून व्यक्त करणं बाबा लोक खूप लवकर थांबवतात. मुलींचा एक भावनिक आधारच ते काढून घेतात.

मोठी होताना त्या स्पर्शासाठी आसुसलेलं असणं प्रियांकाला आठवतं. वयाच्या पाचव्या वर्षानंतर तिला तो मिळालाच नाही. अनेकजणींची हीच व्यथा आहे आणि आपल्या बाबांच्या मुकल्या स्पर्शाची हीच कथा आहे.

फेसबुकवरील मूळ इंग्रजी लेख : प्रियांका बोरपुजारी

https://www.facebook.com/Induviduality/photos/a.628006743976090.1073741841.183134745129961/634535813323183/?type=1

संपादक, मुद्रक, प्रकाशक व मालक – डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी पालकनीती परिवार करिता ड्रीम ग्राफिक्स, सी-१०२, सुनिता अपार्टमेंट, १४१७ कसबा पेठ, पुणे-४११०११ येथे छापून घेऊन अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, कर्वे रस्ता, पुणे-४११००४, येथे प्रकाशित केले.

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

संवादकीय

काळ वेगाने बदलतो आहे. एका बाजूला जग जवळ येत असताना माणूस मात्र स्वत:ला वातानुकूलित खुराड्यात डांबून घेत आहे. आज माणूस आणि यंत्र यांचे नाते इतके घनिष्ठ झाले आहे की तो आपली संवेदनाच हरवून बसला आहे. माणसामाणसातील अंतर वाढले आहे. दुसऱ्या बाजूला सांस्कृतिक दहशतवाद डोके वर काढत आहे. संस्कृती रक्षणाच्या, धर्म रक्षणाच्या नावाखाली घरवापसी सारखे कार्यक्रम सुरू आहेत. वरकरणी यांचे स्वरूप सामान्य वाटले तरी हा एक प्रकारच्या सांस्कृतिक दहशतवादाचाच भाग आहे.

तालिबानी धर्मांधांनी पेशावर येथील सैनिकी शाळेत केलेला अमानुष हल्ला हे कशाचे द्योतक आहे? पुरुषसत्ताक पद्धतीतून पुरुषांना मिळालेल्या धार्मिक, आर्थिक आणि सामाजिक आधिपत्याचे फलित पेशावरच्या हल्ल्यातून दिसते. हिंसाचाराच्या कारणांचा शोध घेताना आपली कुटुंबव्यवस्था, समाजातील विषमता आणि माध्यमांचा समाजमनावर पडणारा प्रभाव यांचा विचार व्हावा. समताधिष्ठित समाजाचे स्वप्न पहायचे तर सुरुवात घरापासून व्हायला हवी आणि माणूस हाच विकासाचा केंद्रबिंदू असायला हवा. असा माणूस जो संवेदनशील, सहिष्णू आणि स्वतंत्र विचार करण्याची क्षमता असणारा असेल. अशा माणसाच्या घडण्याची सुरूवात अर्थातच बालपणापासून होते.

मुलांना घडवणे ही आई आणि बाबा यांची एकत्रित जबाबदारी आहे. पण परंपरागत पद्धतीत बाबा पालकत्व हे कायम राकट, धाडसी आणि कुटुंबाला भौतिक गोष्टींचा पुरवठा करणारे असेच रंगवले गेले. ही प्रतिमा समाजमान्य असल्याने त्याच्या पलीकडे जाऊन विचार करण्याला खीळ बसली आहे. प्रसारमाध्यमेही अगदी घरात राजरोस आक्रमण करून सर्व बाजूंनी या प्रतिमेला पुष्टी देतात.

कोणत्याही पालकांना आपल्या पाल्याबद्दल चिंता असते. त्याला बाबा पालकही अपवाद नाहीत. आपल्या पाल्याबद्दलचे प्रेम आणि भविष्याबद्दलची चिंता त्यांच्याकडून कायम अभिव्यक्त होत असते आणि ते नैसर्गिकही आहे. शहरामधील झोपडपट्टीत राहणारे पालक आर्थिकदृष्ट्या अतिशय हालाखीचे जीवन जगत असतात पण त्यांना आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत शिकवण्याची तीव्र इच्छा असते. ते वाटेल ती किंमत मोजून आपल्या मुलांना तेथे दाखल करतात.

इथे मुद्दा हा नाही की कसे बिचारे पालक राबून मुलांची स्वप्ने पूर्ण करताहेत, तर हा आहे की बापाची भूमिका काय असावी हे आज बाजार ठरवतो आहे. इन्शुरन्स पॉलिसीच्या जहिरातीतील बाबा म्हणजे अपेक्षा पूर्ण करणारे मशीनच जणू! या अवास्तव अपेक्षांमुळे मेटाकुटीला आलेले बाबा पालक मात्र माध्यमांतून क्वचितच नजरेस पडतात.

बाबा या भूमिकेच्या वेगवेगळ्या पैलूंना न्याय देण्याचा प्रयत्न या अंकामध्ये केला आहे. शिवाय केवळ नेहमीच्या आई-बाबा-मुले अशा प्रकारच्या कुटुंबातील बाबांबद्दल न मांडता अगदी वेगळ्या वाटेवरच्या बाबा लोकांनाही अंकात जागा दिलेली आहे.

नवीन वर्षात 'विचार करून पाहू' आणि 'शहाणी वेबपाने' ही दोन नवीन सदरे सुरू करत आहोत. 'विचार करून पाहू' मधून मेंदूविज्ञान व बालशिक्षणातील आधुनिक संशोधनाच्या अनुषंगाने पालकत्वाकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी देण्याचा प्रयत्न करणार आहोत, तर 'शहाणी वेबपाने' मधून इंटरनेटवरील काही चांगले व्हिडिओ, वेबसाईट्स, ब्लॉग वाचकांपर्यंत पोहोचवणार आहोत.

या दोन सदरांमधून कळते की आपल्या लहान मुलांसोबत हसणे, खिदळणे, खेळणे आणि एकूणच तणावरहित वातावरण निर्माण करणे त्यांच्या विकासासाठी किती महत्त्वाचे आहे. दुर्दैवाने बाबा म्हणजे कडक, कठोर, शिक्षा करणारे असेच मुलांसमोर येतात. 'जरा नको का धाक कुणाचातरी!' असे समाजात सर्रास बोलले जाते आणि भाऊंनी लिहिल्याप्रमाणे 'आपण तसले लाड बीड करत नाही' असे सांगण्यात बाबांनाही अभिमान वाटतो. खरे तर जगण्यातल्या आनंदाला आणि मुलांशी बनू पाहणाऱ्या महत्त्वाच्या बंधाला ते मुकताहेत हे त्यांच्या लक्षातही येत नाही.

पुरुषसत्ताक पद्धत आपल्यावर 'हळवे होणे म्हणजे कमकुवत असणे' हे वर्षानुवर्षे बिंबवत आलेली आहे. या पद्धतीमुळे स्त्रीजातीला झालेल्या त्रासाबद्दल बोलायलाच नको. पण पुरुषही काही फारसे सुखात नाहीत. पुरुष आणि स्त्री पालकांचाही 'पारंपरिक बाप' या भूमिकेकडून सुजाण व संवेदनशील पालकत्वाकडे प्रवास व्हावा म्हणून हा अंकप्रपंच.

■ ■ ■

होलपडणारी पावलं

दाराशी होलपडणाऱ्या पावलांनी
येणाऱ्या बापाला बघून
पोरांनी घाबरून
आईला बिलगून घेतलं.
तीच स्वतः खूप घाबरलेली
तरी तिनं पोरांना पदराआड लपवलं.
रोजचंच मग सगळं
त्याच शिव्या तेच किंचाळणं
कधीतरी मध्यरात्री मग
बापाच्या झोपेमुळे सगळं थांबलं.
पोटाशी पाय घेऊन
पोरांनीही सुटलो म्हटलं.
रोजचीच सकाळ मग,
रोजचीच शाळा.
न बोलता काम करणारी आई
आणि अस्ताव्यस्त पसरलेला बाप बघतच
पोरांनी स्वतःच स्वतःचं आवरून घेतलं.
कसंबसं खाऊन थोडं
शाळा नावाचं ठिकाण गाठलं.
हसत शाळेत येणाऱ्या पोरांना
पोट भरून पाहून घेतलं.
स्वतःच्या बापाचं बोट धरून
शाळेत येणारी पोरं पाहून
मागंदेखील वळून बघितलं.

रुपाली सुभाष फरांदे
rupaleepharande@gmail.com
9960591947

छेद अंधाराला

सेवा रामचंद्र गडकरी

प्राथमिक आश्रमशाळा सांगवीचे सेवा रामचंद्र गडकरी हे समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असणाऱ्या आश्रमशाळेतील वंचित मुलांसाठी सतत धडपडणारे, प्रयोगशील शिक्षक. ज्यांच्या वाट्याला कायमच संघर्ष आला त्यांची या मुलांसाठी असलेली धडपड पाहून समाधान वाटते. त्यांच्या कार्याचा आढावा त्यांच्याच शब्दात.

प्रत्येकाचा भूतकाळ हा संघर्षाचा असतो. मी जसा घडलो तो काळ वेगळा होता परंतु आज या विद्यार्थ्यांना घडवत असताना मीही घडत गेलो. मी दोन वर्षांचा असताना आईने जगाचा निरोप घेतला. वडील कर्णबधीर, घरात सर्वात लहान मी, तीन बहिणी आणि एक भाऊ अशा कुटुंबात माझी जडण घडण झाल्याने मी आश्रमशाळेतील मुलांच्या भावनांशी जोडला गेलो. माझे स्वतःचे शिक्षण सातारा येथील रिमांड होममध्ये झाले. आता त्याला निरीक्षणगृह असे म्हणतात. तो काळ खूप भयानक होता. परंतु आजही या शाळांमधील स्थिती फारशी बदलली आहे असे म्हणवत नाही.

आश्रमशाळा म्हटले की समाज तुच्छतेनेच पाहतो. पण मला त्याची खंत वाटत नाही. माणसाचा भूतकाळ जीवन जगायला शिकवतो. पाठीमागे वळून पाहिले तर अंधाराला छेद देऊन प्रकाश उतरलाय असे वाटते.

आश्रमशाळांमध्ये आलेली मुले ही आपले घर, आपले आई-वडील, गाव सोडून परिस्थितीमुळे इथे आलेली असतात. या परिस्थितीतून मी स्वतः गेल्याने या मुलांची मानसिकता मला समजते. मी कायम मुलांच्या मनातील दुःख, अपेक्षा ओळखण्याचा प्रयत्न करत असतो. जसे आपण या परिस्थितीतून, संघर्षातून, अथक परिश्रमातून शिकलो तसेच त्यांनीही शिकावे असे वाटते.

काही विद्यार्थ्यांना विसरणे अशक्य आहे. मी इयत्ता पाचवीचा वर्गशिक्षक होतो. माझ्या वर्गात आकाश नवनाथ शिंदे नावाचा डवरी गोसावी समाजाचा मुलगा होता. तो मूळचा अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगावचा. अतिशय होतकरू पण परिस्थितीने गांजलेला. खेळात तरबेज. मला त्यावेळी क्रीडा प्रबोधिनीची माहिती मिळाली होती. मी ठरवले, काहीही झाले तरी या मुलासाठी प्रयत्न करायचे. मी त्याला निवड चाचण्यांसाठी घेऊन गेलो. सर्व क्रीडा नैपुण्यात तालुका, जिल्हा, विभाग व राज्य पातळीवर तो चमकला. इथपर्यंत पोहचण्यासाठी त्याला लागणाऱ्या सुविधा पुरवत गेलो. शारीरिक सुदृढता टिकवण्यासाठी पोषक आहार मी स्वतः घेऊन जायचो. दूध, अंडी, फळे सर्व नेले.

मला आठवते, शेवटची निवड चाचणी होती. त्याला तीन गुण कमी होते आणि धावणे हाच भाग राहिला होता. मी त्याच्या जवळ गेलो आणि त्याला म्हणालो, 'आकाश, आपला इथपर्यंतचा प्रवास कसा होता हे तू जाणतोसच, तेव्हा मी तुला जास्त काही सांगणार नाही.' आई-वडिलांचे, कुटुंबाचे चित्र मी त्याच्यासमोर उभे केले.

आकाशने २ मिनिटे ४० सेकंदात पार करायचे ८०० मीटर अंतर २ मिनिटे २९ सेकंदातच पार केले. माझ्या डोळ्यात अक्षरशः अश्रू आले. पोर जिवाच्या आकांताने धावले होते. एक पल्ला गाठला. पण खरी लढाई तर पुढेच होती. कागदपत्रे जमा करायची होती. मी कामाला लागलो.

सन २०११-१२ चे शैक्षणिक वर्ष. शाळा नुकत्याच सुरू झालेल्या. पहिल्याच दिवशी मला आकाशच्या गावी जाऊन

कागदपत्रे आणण्याची परवानगी मिळाली. मी मोटार सायकलवरून त्याला घेऊन निघालो. पावसाळ्याचे दिवस होते. अंधार पडत होता. मला पुसटशा झोपडया दिसू लागल्या. त्याच झोपड्यांमध्ये थोडीशी बाजूला आकाशची झोपडी. वरचे छत जागोजागी सांधलेले होते. आम्ही घरी पोहचलो. आई वडिलांना थोडे नवल वाटले. हे सर कोठे राहणार, आपल्या हातचे, आपल्या घरचे जेवण कसे खाणार? हे प्रश्न त्यांच्या चेहऱ्यावर जाणवत होते. मी तीन दिवस त्यांच्या झोपडीत राहिलो. तेल मिठापासून ते सर्व बाजाराला मीच पैसे दिले.

आकाशच्या घरी घालवलेले ते तीन दिवस मी आयुष्यात विसरू शकत नाही. ती माणसे जेवढी गरीब होती तेवढीच मनाने श्रीमंत. माझे त्यांच्याशी जडलेले जिवाभावाचे नाते आजही टिकून आहे. मी त्यांच्या कुटुंबाचाच सदस्य बनलो आहे.

सर्व कागदपत्रे मिळाली. मला खरे तर निघावे असे वाटतच नव्हते. आई वडिलांच्या डोळ्यात अश्रू तरळले.

आकाशचा प्रवेश सांगली येथे क्रीडा प्रबोधिनीत झाला. आज तो धनुर्विद्येचे प्रशिक्षण घेत आहे. मागील आठवड्यात त्याच्या प्रशिक्षकांचा फोन आला होता. 'सर, तुमचा विद्यार्थी राज्यस्तरीय उंच उडी स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवून प्रथम आला. आता त्याची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली आहे.' ही वार्ता ऐकून माझा आनंद गगनात मावेनासा झाला. आकाश खूप जिद्दी होता. प्रत्येक कसोटीला तो उतरला. यश त्याच्या प्रयत्नाने मिळाले. मी फक्त त्याला मदतीचा हात दिला.

आकाशच्या शाळेतील सत्कार कार्यक्रमात मलाही शाल श्रीफळ मिळाले. मी आजही ती शाल जपून ठेवली आहे. ज्या परिस्थितीत आज ही मुले आश्रमशाळेत शिकताहेत ती परिस्थिती कधी बदलेल माहीत नाही. मात्र आज मी जो कोणी आहे तो या चिमुकल्यांमुळेच याचे भान मला कायम असेल. आता मी नवीन आकाशच्या शोधात आहे.

– सेवा रामचंद्र गडकरी
शब्दांकन : सोमीनाथ घोरपडे
bhimai05@gmail.com
7387145407

■ ■ ■

अब फिर से स्कूल खुलेगा

अब फिर से स्कूल खुलेगा
अब फिर से नए सपने जागेंगे
वही चहल-पहल
मजाक-मस्ती
सब फिर से शुरू होगा
पर
गम इस बात का है
कि,
कुछ साथी जो
दूर के सफर पे चल दिए
अब लौट के ना आनेवाले
उनकी किलकारियाँ
नहीं सुनाई देंगी
उनकी आवाजें न जाने
कहाँ खो गईं
अब वह टीचर भी नहीं होंगी
जिनकी आवाज
दुआ में नए रंग भरा करती थी
जिनकी प्यारी मुस्कान
आँसू भुला दिया करती थी
अब फिर से स्कूल खुलेगा
तालीम का नया रंग होगा
अमन और शांती का
नया परचम दिलों में लहराएगा
खुशियों और चाहत का
अब फिर से सपने जागेंगे
अब फिर से स्कूल खुलेगा!

फारूक काझी
faruk_skazi@yahoo.com
8275459276

बाबा झोरो

मंजिरी निंबकर



लदाखहून परत येताना नादिया, माझी लेक पिस्तोला घेऊन आली. पिस्तो हे ६ महिन्यांचे कुत्र्याचे पिलू. तिबेटी व झान्स्कर कुत्र्यांचा संकर. ६ महिन्याचेच असूनही आपल्याकडल्या मोठ्या वाढलेल्या गावठी कुत्र्याएवढा आकार. अंगावर, तोंडावर भरपूर केस. तोंडावरच्या झिपऱ्यांमधून लुकलुकणारे डोळे. असा हा पिस्तो कुत्रा कमी, अस्वल जास्त दिसत होता. त्याला पाहिल्या पाहिल्या आमच्या अर्ध्या पॉम कुत्रीने, चंपीने जी काय उंच किनऱ्या आवाजात करवादायला सुरुवात केली की बस्स! पिस्तो जरा हलला की ही किंचाळायची. पण चंपीच्या नौटंकीची आम्हाला सवय होती. चिंता वाटत होती ती झोरोची. झोरो आमचा १२ वर्षांचा मोठाड कुत्रा. तापट स्वभावाचा. पिस्तोला जर त्याने स्वीकारले तरच आम्ही हुश्श करू शकणार होतो. बांधलेला असताना तो अधिकच आक्रमक होतो. त्यामुळे संध्याकाळी घरामागच्या नीरा उजव्या कालव्याच्या भराव्यावर फिरायला नेताना दोघांना मोकळे सोडायचे ठरले.

आधी झोरोला सोडले. तो भराव्यावर चढल्यावर पिस्तोची साखळी सोडली. अल्लड पिस्तो धावत वर चढला. झोरो सावध उभा होता. दोघांनी एकमेकांच्या नाकाला नाक लावले. एकमेकांच्या शेपट्यांचा वास घेतला. झोरोने गुर्र केले. पिस्तोने कू कू केले. एक-दोन वेळा गोल गोल फिरून शेवटी झोरो पुढे आणि पिस्तो मागे असे भराव्यावर फिरायला निघाले. रस्त्याच्या कडेला झोरो कसलासा वास घ्यायला थांबला की पिस्तोही थांबे. पिस्तोला सारेच वास नवे. त्यामुळे तो जरा जास्तच वेळ थांबला तर पुढे गेलेला झोरो मागे बघून जागीच वाट बघायला थांबल्यासारखा थांबे. पिस्तो पुन्हा चालायला लागल्यावर झोरोही चालू लागे.

भराव्याखाली थोड्याशा अंतरावर एका झाडाखाली कावळ्यांची शाळा भरली होती. पिस्तोला मोठे कुतूहल वाटले. तो धबडक धबडक करीत खाली उतरला. झोरो पुन्हा थांबला. पिस्तोचा अडाण्याचा गाडा खाली उतरल्या उतरल्या कावळे उडून गेले आणि पिस्तो पुन्हा उलट पावली भराव्यावर हजर झाला. उत्साहात पुढे निघालेल्या पिस्तोला झोरोने हळूच गुरकावले. जणू कुत्र्यांच्या सभ्यतेत हे बसत नाही असे सांगायचे असावे. पिस्तो घाईने झोरोच्या मागे जाऊन उभा राहिला. पुन्हा गाडी पुढे निघाली.

दूरवर फिरून आल्यावर झोरो एका ठिकाणी पाणी प्यायला कॅनॉलमध्ये उतरला. पिस्तो बराच उभा राहून बघत होता. झोरो आणखी पुढे झाला. छातीपर्यंत पाण्यात उतरून पाणी पिऊ लागला. आता मात्र पिस्तोला राहवेना. तो दबकत खाली उतरला आणि पंजे बुडवून पाणी प्यायला.

घरच्या रस्त्यावर एक घर लागते. तिथली राणी कुत्री गळ्यात घुंगराचा पट्टा मिरवत चेनलिंकच्या कुंपणाच्या आत फिरत असते. ती झोरोची मैत्रीण. त्यामुळे घरी येता येता नेहमीच्या सवयीने झोरो ते घर येताच भराव्यावरून खाली उतरला. राणी कुठे दिसत

(पान १९ वर पाहा)

एका बापाचा प्रवास

प्रकाश अनभूले

आज मी थोडा बेचैन होतो. सकाळी घरातून शाळेत येताना पुन्हा पुन्हा पूनमची विचारपूस करीत होतो. शाळेत जाताना दवाखान्यात नंबर लावतो. तू आईबरोबर ये आणि मला फोन कर. असे पुन्हा पुन्हा बजावत होतो. मी कम्प्यूटर शिक्षकाचे काम करतो. आजही शाळेत काम सुरू होते मात्र एक ताण वाटत होता. सतत फोन येतोय असे वाटत होते. दुपारी आम्ही आमच्या ऑफिसमध्ये जेवण करायला बसलो. माझा फोन वाजला आणि मी थोडा स्तब्ध झालो. आई फोनवरून दवाखान्यात लवकर ये म्हणत होती. ती थोडी घाबरलेली वाटत होती. मी जेवण तसेच सोडून दवाखान्याकडे निघालो. दवाखाना शाळेपासून अगदी तीन मिनिटांच्या अंतरावर होता मात्र मला रस्ता संपत नाही असे वाटत होते. मी डॉक्टरांच्या केबिनकडे गेलो. डॉक्टर शांतपणे सांगत होते, आपल्याला सिझेरियन करावे लागेल. बाळाला पाणी कमी पडत आहे. तुम्ही लवकर निर्णय घ्या. खरे तर अशा परिस्थितीमध्ये आपण निर्णय करीत नसतो. आपण फक्त निर्णयाला दुजोरा देऊ शकतो. डॉक्टरांनी थोडा विश्वास दिला. आई आणि मी एका मोठ्या बंद दरवाजाबाहेर काळजीयुक्त चेहऱ्याने बसून होतो.

काही काळ मी माझ्या गेल्या काही महिन्यांच्या प्रवासात गेलो. जून २००९ पासून हा प्रवास सुरू झाला. आपल्या घरात बाळ येणार या कल्पनेने साहजिकच घरात आनंदी वातावरण होते. पण थोडी काळजी देखील होती. एकीकडे नवीन घराचे काम काढले होते. अनेकांचे अनेक सल्ले येऊ लागले होते- घर आणि बाळंतपण एका वर्षात नसावे. सध्या मी भाड्याने राहत होतो त्यामुळे दुसऱ्याच्या घरात बाळ जन्माला येणे यावर देखील अनेकांची मते व्यक्त होत होती. मी मात्र ठाम होतो. फक्त मी पूनमला विचारत होतो की हे तुझ्यावर खूप लवकर लादले जात नाहीये ना.

हळू हळू माझ्या रोजच्या वेळापत्रकातही बदल करीत जात होतो. रोज शाळेत निघताना माझ्याबरोबरच पूनमने जेवले पाहिजे असा आग्रह धरीत होतो. जेवणात शक्य तेवढी पौष्टिकता आणायचा प्रयत्न जाणीवपूर्वक सुरू होता. प्रत्येक तपासणीच्या वेळी नवे सल्ले मिळत होते- तब्येत नाजूक आहे, आहार अजून चांगला झाला पाहिजे. तसे माझे नियोजन बदलत होते. काही पुस्तके वाचून आहार कसा असावा याची पुन्हा पुन्हा चाचपणी करीत होतो. रोज रात्री आठवणीने बदाम, बेदाणे भिजत घालायचो. सकाळी ते खायला द्यायचो. आहाराबद्दल कायम निष्काळजी असणारा मी आता आहारशास्त्राचा अभ्यास करीत होतो. मनसंस्कार, गर्भसंस्कार, प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीपश्चात काळजी अशाही विषयांचा मी अभ्यास करीत होतो. आजवर कोणत्याच विषयाचा मी एवढा सखोल अभ्यास केला नव्हता. कधी कधी वाटायचे, आपण आपल्या स्वार्थासाठी तरी ही सारी काळजी करीत नाही ना. मग विचार यायचा, आपले बाळ नेहमी निरोगी असावे, मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या सुदृढ असावे असे वाटण्यात काय गैर? तसा मी काही जगातला पहिलाच बाप नव्हतो पण बाप होण्याची तर माझी जगातली पहिलीच वेळ होती!

घरातील वातावरण अध्यात्मिक असल्यामुळे वडील अधून मधून घरात कबीर, मीराबाई, आणि काही पंजाबी संताचे शब्द लावत होते. शेजारी पाजारी माझे लहानपणापासून खूप लाड करणारे. त्यामुळे मी बाप होणार हे समजताच शेजारच्या अराद्यांच्या घरापासून सर्वांकडूनच पूनमला नवनवे पदार्थ मिळू लागले. मी कधी कधी काळजीत पडायचो की काय खायला द्यावे आणि काय नाही. पण कुणाचे मन न दुखावता पुढे जात होतो. जिथे राहत होतो तिथे सापांचा बराच वावर होता. गर्भवतीने साप पाहिला तर मूल सतत जीभ बाहेर काढत राहते अशी एक अंधश्रद्धा आमच्या गल्लीतून घरात

आली. आणि मग काय, पूनमच्या घरातून बाहेर पडण्यावरदेखील देखरेख सुरू झाली. मी या भ्रमातून सर्वांना बाहेर काढण्याचा पूर्ण शक्तीने प्रयत्न करीत होतो. शेवटी एकदा सापाचे दर्शनदेखील झाले! जेवढा वेळ मला कुटुंबियांना शास्त्रोक्त संगोपन कसे असावे हे पटवायला लागला नाही तेवढा वेळ त्यांना अशा भ्रामक समजुतींतून बाहेर काढण्यात लागला!

गेला तास दीड तास विचारांत हरवलेला मी 'ट्याँ ट्याँ' आवाजाने थोडा भानावर आलो. नर्सबाई लगबगीने 'मुलगा झाला हो' असे सांगत आल्या. प्रत्येक जण 'अभिनंदन! पहिला मुलगा झाला' असे अभिनंदन करीत होता. गेल्या काही महिन्यांच्या प्रवासात मी किंवा माझ्या कुटुंबाकडून मुलगा की मुलगी असा विचारच झाला नव्हता! आम्ही सगळे बाळ येणार एवढाच विचार करीत होतो आणि आताही बाळ झाले याचाच आनंद होता.

आतापर्यंतचा हा प्रवास काही महिन्यांचा होता. मात्र आता एक मोठा प्रवास सुरू झाल्याची जाणीव होत होती. लहानग्या तन्मयच्या येण्याने जवळ जवळ अडीच दशकांनंतर आमचे कुटुंब मोठे झाले होते. मी स्वतः विधी, कर्मकांड यांच्या विरोधी भूमिकेचा पण बाळाच्या प्रेमापोटी आणि कुटुंबाच्या आनंदासाठी या साऱ्यातून जात राहिलो.

तन्मयसोबतचा पहिल्या तीन वर्षांचा प्रवास मलाच एक निरीक्षण शक्ती देणारा ठरला. अगदी जन्माच्या पहिल्या दिवसापासून तन्मयचे फोटो टिपण्याचा मी सपाटा लावला होता. त्यामुळे त्याच्या शारीरिक आणि बौद्धिक विकासाचे बारीक निरीक्षण होत होते. घरातील आणि घराच्या अवती भोवतीचे वातावरण याचा त्याच्या विकासावर बराच प्रभाव जाणवत होता. घरातील लोकांचे तो किती बारकाईने निरीक्षण करतो याचा अनुभव एकदा आला. तन्मय दोन वर्षांचा होता. घरात आई आणि आजी नव्हत्या. त्याने स्वयंपाकघरातून कढई, चमचा, ओल्या हरभऱ्याची फोलपाटे आणि एक डबा असे साहित्य गोळा केले. हे सारे घेऊन तो त्याची आई डब्यासाठी जशी भाजी करते त्याची हुबेहुब नक्कल करीत होता. कढईत भाजी टाकणे, ती हलवणे, तिची चव पाहणे आणि शेवटी डबा भरणे. मी सहज लक्ष गेले म्हणून पाहिले आणि थक्कच झालो. मुलांची निरीक्षण शक्ती किती अफाट असते याचे हे उत्तम उदाहरण मी पहात होतो.

तन्मय जसे घरातील लोकांचे निरीक्षण करायचा तसेच अवती-भोवतीचे देखील. माझ्या शेजारी अरादी राहतात. त्यांचे गाणे आणि संबळ या गोष्टींकडे तन्मय सर्वात प्रथम आकर्षित झाला. त्याच्या भाषेत संबळ म्हणजे 'ढपांग'. आणि हे ढपांग तयार कसे करायचे याचे तंत्रदेखील त्याने शोधून काढले होते. एक साधा डफ एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला पाण्याचा जग उलटा करून एकत्र दोरीने बांधला आणि वाजवायला दोन चमचे. असे संबळ घेऊन, कपाळावर नाम ओढून अगदी बेंबीच्या देठापासून स्वरचित गाणे म्हणणे सुरू असायचे. या गाण्यात एक दोन कडवी देवीची तर एक दोन कडवी टी.व्ही. वर ऐकलेल्या गाण्याची.

तन्मयच्या या वेगवेगळ्या भूमिका साकारण्याच्या कलेकडे मी घरातील सर्वांचे लक्ष वेधून घेत होतो. त्यामुळे हळू हळू सर्वांनाच अशा निरीक्षणाचा आनंद घेण्याची सवय जडली. खरे तर अशी निरीक्षणे टिपण्याची दृष्टी थोडीबहुत मला माझ्या शाळेकडूनच मिळाली आहे असे वाटते. या शाळेचा विद्यार्थी असणे आणि आज तिथे काम करणे या दोन्हींमुळे अशा निरीक्षणांचे महत्त्व मी जाणले आणि तन्मयला प्रोत्साहन दिले.

तन्मयच्या जीवनातला पुढचा टप्पा शालेय शिक्षणाचा होता. त्याला कोणत्या शाळेत टाकायचे याचा निर्णय त्याच्या जन्माआधीच झालेला होता. आपले बाळ आपण जिथे घडलो आणि आजही घडत आहे अशा ठिकाणीच शिकावे हे मी तरी गृहीत धरले होते.

पहिल्या तीन वर्षांच्या निरीक्षणातून मी काहीशा भ्रामक कल्पनेत होतो की तो शाळेत आणि शाळेतील वातावरणात लवकरच मिसळून जाईल. पण तसे काही झाले नाही. घराची ओढ ही प्रत्येकालाच असते. घरातील वातावरणातून एका वेगळ्या वातावरणात मुले स्थिरावताना आपल्या सहनशीलतेची कसोटी असते याचा अनुभव तन्मयला शाळेत टाकल्यावर पहिल्या काही दिवसांतच आला. सुरूवातीचे काही महिने शाळेत बसण्यात आणि बसवण्यात गेली.

गेली चौदा वर्षे मी शाळेत काम करत आहे. तरीदेखील कोणत्याही प्रकारची सभा हा काहीसा न आवडणारा प्रकार आता तन्मयचा पालक म्हणून मला आवडता करावा लागणार होता. तन्मयच्या शाळेतील पालकसभांना मी जिज्ञासेपोटी हजेरी लावू लागलो. आजवर तांत्रिक व्यवस्थेसाठी अनेक वेळा अशा पालक सभा मी केल्या होत्या. मात्र स्वतः पालक म्हणून अनुभव पूर्ण वेगळा होता. शाळेतील घडामोडी आणि आपले पाल्य यांबद्दल जाणून घेताना मी देखील शिकत गेलो. त्याच्या फाईलींच्या कामात सहभागी होऊन शाळेतला तन्मय पाहत गेलो.

'आता तन्मय चांगला रुळला आहे, आता बऱ्यापैकी आपली काळजी संपली' अशा अविर्भावात मी तन्मयच्या दुसऱ्या शैक्षणिक वर्षात प्रवेश केला. पण एक दोन महिन्यात एक नवे आव्हान समोर येऊन उभे ठाकले. त्याच्या शाळेतील ताई सांगत होत्या की तो मुलांमध्ये नीट मिसळत नाही, सूचना ऐकत नाही आणि काहीसा आक्रमक वागतो. ताईंशी बोलून झाल्यावर मी अनेक प्रकारे विचार केला. या मागील कारणांचा शोध घेण्याचा माझा प्रयत्न सुरू होता. खरे तर हे माझ्यासाठी छोटेसे संशोधन होते. मला लक्षात आले की तो गटात मिसळत नव्हता कारण घरी आणि अवती-भोवती त्याच्याशी खेळणारे त्याच्या वयाच्या जवळपासचे कोणी नव्हते. त्यामुळे एकटे राहणे, खेळणे असे काहीसे त्याचे आधीचे जग होते.

साहजिकच त्याची खेळणी, साहित्य हे फक्त त्याचेच असते, त्यावर कोणाचा हक्क नसतो आणि त्याला कोणी हातपण लावायचा नसतो असा त्याचा समज झालेला होता. घरात त्याचे काही ठरलेले वेळापत्रक नव्हते. त्याचे वेळापत्रक त्यानेच ठरवले होते. म्हणूनच शाळेतील वेळापत्रकात बसणे त्याला थोडे अवघड जात होते आणि या साऱ्या गोष्टींना तो प्रतिकार करीत होता.

तन्मयला यातून बाहेर काढण्यासाठी मला एक महत्त्वाची गोष्ट करावी लागणार होती ती म्हणजे त्याच्यासाठी वेगळा वेळ देणे. माझ्या कामाच्या व्यापातून मी किती वेळ देऊ शकेन हे माहीत नव्हते. पण मी एक ठरवले– किती वेळ देईन यापेक्षा कसा वेळ देईन हे महत्त्वाचे असेल. मी त्याला अधून मधून बागेत घेऊन जायला सुरुवात केली. आपल्याला झोक्यात बसायचे असेल तर इतर मुलांचे होईपर्यंत थांबावे लागेल अशी त्याला जाणीव व्हावी, सी-सॉ खेळायचा तर अजून कुणाची तरी मदत मागावी लागेल अशा गोष्टी न सांगता त्याच्या लक्षात आणून देण्याचा माझा हा एक प्रयत्न होता. त्याच्या वयाच्या मुलांमध्ये त्याला खेळायला नेण्यासाठी देखील घरी सांगून ठेवले. घरापासून थोडे लांब असलेल्या पाहुण्यांच्या मुलांमध्ये कधी त्याची आजी तर कधी आई त्याला रोज घेऊन जाई. त्यामुळे इतरांबरोबर बोलणे, एकत्र खेळणे, दुसऱ्याचे म्हणणे ऐकून घेणे असे अनुभव त्याला कौटुंबिक वातावरणातच मिळायला लागले.

घरात काही वेळा तो काहीच ऐकत नाही असे वाटले तर त्याला 'जरा वेळ विचारांच्या कोपऱ्यात जा' असे मी सांगू लागलो. त्यासाठी घरातील माझ्या संगणकाची खुर्ची म्हणजे त्याचा विचारांचा कोपरा केली. शाळेतील विचारांचा कोपरा घरात कसा काय आला याबद्दल त्याला आश्चर्य वाटले होते पण तो तेथे जाई. ज्या खुर्चीत बसून मी गेली अनेक वर्षे वेगवेगळे चांगले विचार केले तेथे त्यालाही चांगले विचार करता आले याबद्दल मला विशेष आनंद वाटतो. विचारांच्या कोपऱ्यातून आल्यावर सुरुवातीला माझे चुकले म्हणायला त्याला अवघड जात असे पण जेव्हा त्याला प्रोत्साहन दिले तेव्हा तो अजून पुढे गेला. आज कधी कधी जेव्हा माझी चिडचिड होते आणि हा माझा पाच वर्षांचा तन्मय 'इथे बसा' म्हणून विचारांच्या खुर्चीकडे बोट दाखवतो, तो एका बापाच्या प्रवासातला अतिशय सुखद आणि निवांत क्षण असतो.

प्रकाश अनभूले
anbhuleprakash@gmail.com
9960460474

■ ■ ■

बा म्हणतु

बा म्हणतु, सकाळच्या पारी
धर जा दारी
तिनीसांज झाल्याबिगर
ईऊ नगं घरी
मग तुम्हीच सांगा मास्तर
ईऊ कसा साळत?
अवं चुकून आलो साळत
तर बा इतू मागनं पळत
हानत मारत नेतो घरी
आन घरी पाटानीवर
आसुडाची दुरी
भ्यानं जातो रानात पळत
मग तुम्हीच सांगा मास्तर
ईऊ कसा साळत?
एकदा म्हणाला आरं मर्दा
जमिनीला कर कागुद
आन खुरप्याला कर पेन
आन वढ त्याच्यावर रेगा
आन मंग भर गड्या पैक्याच्या बैगा
वरनं म्हणतु तुला नाय कळत
मग तुम्हीच सांगा मास्तर
ईऊ कसा साळत?
आरं नाय जायचं साळत
मळ्यात बसायचं राखण करत
मग आयचा बी काय इलाज नाय चालत
मग तुम्हीच सांगा मास्तर
ईऊ कसा साळत?
मायेनं म्हटला, आरं लेकरा
परकासासारकं सूख पसरत जा
आन दुखाला अंधारात लपवत जा
मग त्याचं बी म्हणणं मला असतं कळत
मग तुम्हीच सांगा मास्तर
ईऊ कसा साळत?

प्रकाश अनभूले
इयत्ता आठवीत असताना,१९९४

मॉमी!!!

मधुरा राजवंशी

मॉडर्न फॅमिली या टीव्ही मालिकेतलं कॅमरिन आणि मिचेल हे एक गे जोडपं- मिच आणि कॅम. लिली ही त्यांची व्हिएतनामीज दत्तक मुलगी. आज दोघांनी लिलीच्या डॉक्टर बाईंना घरी जेवायला बोलावलंय. गप्पा चालू असताना दीडेक वर्षांची छोटी लिली डॉक्टर बाईंकडे पाहून तिचा आयुष्यातला पहिला शब्द उच्चारते- 'मॉमी'! (मिचच्या शब्दांत सांगायचं तर- Every gay father's worst nightmare!) मिच आणि कॅमच्या पायाखालची जमीनच सरकते.

''घरी राहता यावं म्हणून मी नोकरी सोडली, पण ते पुरेसं नाहीये असं दिसतंय. कदाचित आम्ही तिला पुरेशी स्त्री-ऊर्जा देऊ शकत नाहीये...'' बोलता बोलता कॅमला हुंदकाच येतो. मिचलाही मग शंका येऊ लागते, आपलं सगळंच चुकलं का काय?

डॉक्टर बाई दोघांना समजावण्याचा प्रयत्न करतात, मला नाही वाटत त्या शब्दाला काही अर्थ आहे. लिलीनी तो असेच काही आवाज जुळवून म्हटला असणार. हे ऐकून या दोघा बाबांच्या जरा जिवात जीव येईतो लिली पुन्हा 'मॉमी' म्हणते.

दिवसभर भयंकर अस्वस्थ असणारे दोघं रात्री लिलीचं अंथरूण घालत असताना अचानक कॅमचा पाय लिलीच्या बाहुलीवर पडतो. बाहुलीतून आवाज येतो- 'मॉमी'. दोघं अविश्वासानं एकमेकांकडे बघतात आणि मग एकदम आनंदाने मिठी मारून नाचायलाच लागतात!

खानदान की इज्जत जपण्यात मग्न पुरुषांमध्ये आणि भरजरी साड्या घालून एकमेकींच्या सरबतात विष मिसळणाऱ्या बायकांमध्ये आपल्या बहुसंख्य मालिका अडकलेल्या असताना असं काहीतरी टीव्ही सिरीयलमध्ये बघायला मिळणं हे फारच सुखावणारं असतं.

मिच आणि कॅमला स्टीरिओटिपिकल नवरा आणि बायको असे रोल नाहीत. मदर्स डे ला ते दोघे लिलीला बागेत घेऊन गेलेले असताना तिथे आपापल्या बाळांसह ग्रूप फोटो काढणाऱ्या खूपशा आया कॅम आणि लिलीला फोटोसाठी ओढून नेतात. कारण समाजाच्या नजरेत घरी राहून लिलीला सांभाळणारा आणि बायकी हावभाव करणारा कॅम हा आई आहे तर कुटुंबासाठी कमावून आणणारा मिच हा बाबा. नाराज झालेल्या कॅमला मिच समजावू पाहतो की आपलं कुटुंब हे नव्या प्रकारचं कुटुंब आहे. त्याला लोक अजून सरावलेले नाहीत. कुटुंब म्हटलं की लोकांना एक आई हवी असते आणि एक बाबा.

खरे तर कॅम आणि मिच यांची व्यक्तिमत्त्वे याहून अधिक गुंतागुंतीची आहेत. कॅमचे हावभाव आणि चाल स्त्रीसुलभ आहे, तो अधिक संवेदनशील आहे आणि घरी राहून लिलीला सांभाळणं, जेवण बनवणं, बाजार करणं ही समाजानं स्त्रियांसाठी ठरवून दिलेली कामं तो करतो. मात्र त्याचबरोबर तो खेळाडूही आहे. आणि काही बिघडलं तर पटकन दुरुस्त करणं, भराभर निर्णय घेणं ही 'पुरुषी' कामेही करतो. याउलट मिच हा रूढार्थाने अधिक मर्द दिसणारा, कमावणारा असला तरी खूपशा गोष्टींसाठी तो कॅमवर अवलंबून आहे. आणि खूप काळजी करणं, किड्यांना घाबरणं हे तथाकथित मर्दानगीला बट्टा लावणारे गुणधर्मही त्याच्यात आहेत. याचमुळे ही पात्रं आपल्याला खरी आणि जवळची वाटतात.

आणि हे कोणत्याही पालकासाठी खरंच असेल. सर्वच व्यक्तींमध्ये स्त्रीत्व आणि पुरुषत्व दोन्हीचे गुणधर्म कमी अधिक प्रमाणात असतात. खरं तर ही नावंही आपणच दिलेली आणि या गुणधर्मांची विभागणीही आपणच केलेल्या घडणीतून आलेली. केवळ मनुष्यत्वाचे गुण लोकांमध्ये दाखवणाऱ्या मालिका आपल्याकडे यायला कदाचित अजून बराच उशीर लागेल.

मॉडर्न फॅमिलीसारख्याच टू अँड अ हाफ मेन, फुल हाउस या मालिकाही बाबांच्या गमती जमती दाखवतात. बाबांबरोबरच मुलांसाठी जीव ओवाळून टाकणारे इतरही पुरुष यांमध्ये आहेत. मुलांसाठी जेवण बनवणं, शाळा शोधणं, त्यांच्याबरोबर पुस्तक वाचणं, गप्पा मारणं, खेळणं, त्यांचा अभ्यास घेणं, त्यांच्या वयासोबत येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी त्यांच्याशी चर्चा करणं अशी सगळी कामे हे पुरुष मनापासून करतात. आणि हे सर्व सुखासुखीच घडत असतं असंही नाही. त्यांची पुष्कळ तारांबळ उडते, भयंकर चिडचिड होते! हे सगळं पाहताना आपल्याला हसू तर येतंच पण कुठेतरी हेही माहीत असतं की आपण त्या जागी असतो तर आपलंही हेच झालं असतं!

मधुरा राजवंशी

rmadhuraa@gmail.com

8275369702

■ ■ ■



मी आणि पप्पा, साईश, इयत्ता पहिली, कमला निंबकर बालभवन,फलटण

तुमच्यासारखे वडील पायजेल होते!

भाऊसाहेब चासकर

मनीषा आणि मैत्रिणी आवळ्याच्या झाडाभोवतीचं गवत काढत बसलेल्या. त्यांच्यात गप्पागोष्टी सुरू होत्या. मी तिथं थांबलो. गप्पांत सहभागी झालो. मुलींचं जगणं, रोजची कामं, घरच्यांचं वागणं अशा विषयांवर त्यांचं मनमोकळं बोलणं सुरू होतं. ग्रामीण भागातल्या मुलींचं साधारण भावविश्व काय आहे, हे मला बऱ्यापैकी ठाऊक होतं. आताच्या त्यांच्या बोलण्यातून एक प्रकारचा विषाद जाणवत होता. त्यांचं प्रश्नांकडं बघणं, विचार करणं लक्षात येत होतं. एरवी वर्गात अशा चर्चा फारशा होत नाहीत. झाल्या तरीही त्यात इतका मोकळेपणा नसतो. या मैत्रिणींच्या गटात छान शेअरिंग होतं. मुली अनुभव वाटून घेत होत्या. 'कुटुंबातले मोठे लोक रुबाब करतात. वाटेल तसे वागतात. अनेकदा मारतातही... सारखी कामं सांगून छळतात. कामं झाली की अभ्यास करायचा. खेळायला, टी.व्ही. पाहायला थोडासाही निवांतपणा नसतो. खूप राग येतो सगळ्यांचा... मोठे तितके खोटे!' अशी जवळपास सगळ्याच मुलींची तक्रार होती.

'तुम्ही अगस्तीवर (अगस्ती म्हणजे माझा मुलगा) रागावता का? त्याचं काही चुकल्यास त्याला मारता का? दिवसातून त्याला किती कामं सांगता?' मनीषाच्या तीन-चार प्रश्नांची तोफ माझ्या दिशेने धडधडली. 'मी त्याच्याशी भरपूर खेळतो. गप्पा मारतो. दंगामस्ती करतो. सोबत ट्रेकिंगला जातो. घरातली करता येतील अशी कामं आम्ही तिघे मिळून करतो. तो माझा मुलगा कमी; मित्रच जास्त आहे...' मी सांगत होतो. सगळ्याजणी मन लावून ऐकत होत्या. संवेदनशील आणि हळव्या मनाची मनीषा किंचित भावूक झालेली. तिचा चेहराच तसं सांगत होता. ती पुढं हळू आवाजात म्हणाली. 'सर, एक सांगू का?' 'सांग.' 'तुमच्यासारखे वडील मला पायजेल होते!' ती क्षणात उद्गारली. लगेच अबोल झाली. तिचं ते एक वाक्य मला खूपच अस्वस्थ करून गेलं. माझ्या डोक्यात हजारो मुंग्या कालवल्यासारखं झालं. 'का बरं तुला असं वाटतं गं?' मी विचारलं. आधी तिनं उत्तर टाळलं. 'मी सहजच म्हणले ओ सर', असं म्हणत वेळ मारून नेण्याचा अपयशी प्रयत्नही तिनं करून पाहिला.

मनीषा तशी चुणचुणीत, सुस्वभावी. नम्र आणि आज्ञाधारक. तिच्याशी बोलताना तिला घरात नीट वागणूक मिळत नसल्याचं समजलं. तिच्या आत्मसन्मानाला ठेच पोहोचलेली. कुटुंबात तिचं स्वतंत्र अस्तित्वच नाकारलं जात होतं. तिचा 'स्वीकार' होत नव्हता. कपडालत्ता, वही-पेन, अशी कोणतीही वस्तू घेताना काय हवे? कसे हवे? रंग कोणता? असे तिला साधे कोणी विचारतही नसल्याची तिची खंत. तिच्या आशा-आकांक्षांचं, आवडीनिवडींचं कोणाला काहीच देणंघेणं नव्हतं. भावाशी प्रेमानं वागणारे, त्याचे लाडकोड पुरवणारे, दुजाभाव करणारे लोक मनीषाला आवडायचे नाहीत. तिला ते घरच नकोसं वाटू लागलेलं! एरवी मनातलं दिलखुलासपणे बोलणारी मनीषा एकाएकी गप्पगार झाली. माझ्या मनाच्या डोहात तिनं खडा टाकला होता... त्याचे तरंग उमटतच राहिले... त्या सहज' उद्गारामागं तिला खूप काही सांगायचं होतं.

बहिरोबा टेकडी परिसरात शाळेतल्या मुलांनी दीडेक हजार झाडं लावलीत. केवळ लावलीच नाहीत; जगवलीतदेखील. 'आमचं सीताफळाचं झाड पाहिलं का किती मस्त झालंय...', 'अगं, ते वडाचं झाड बघ किती उंच वाढलंय...', 'हे बघ, शेवग्याच्या झाडाला शेंगाबी आल्यात...' असे संवाद मुलांमधून ऐकू येत होते. चेरीच्या झाडाला तर मुलांचा भलामोठा गराडा पडलेला! कच्च्या चेऱ्या खाण्यात सारी बच्चे कंपनी दंग! कोण टेकडीवर गेलेले, कोणी कोणी झाडावर चढलेले... उनाड वाऱ्यासोबत मुलं मस्त हुंदडताहेत... हिरव्यागार निसर्गातल्या पावसाळी वातावरणाची पुरेपूर मजा लुटणारी खूप सारी मुलं भोवताली होती. पावसाळ्याच्या तोंडावर काजवे विशिष्ट झाडांना लडिवाळपणे 'पिंगा' घालतात नं तशी काहीजण मला बिलगतही होती. पण आतून पोखरलेल्या मनाची मनीषा माझ्या मनात घर करून रुतून बसली होती.

दुसऱ्या दिवशी शाळेत आल्यावर मनीषाला गाठलं. तिला बोलतं केलं. बापाचं दारू पिणं, तंबाखू खाणं, आईला, भावंडांना मारहाण करणं, त्यातून होणारी भांडणं, कटकटी सारं सारं तिला नकोसं झालेलं... या वैतागात तिचं बालपण पार कोमेजून चाललेलं. 'अगस्तीसारखेच तुम्ही आम्हालाही जीव लावता. आमच्यासोबत खेळता. गंमतीजमती करता. आमच्या मनासारखं वागता. काही चुकलं तर समजून सांगता. मारत नाही. पोरांना वाचायला पुस्तकं आणता. शाळेत पोरं आजारी पडल्यावर दवाखान्यात घेऊन नेता. तुम्ही दारू पेत नाही. गुटखा-तंबाखू खात नाही. म्हणून मला पण वाटले की तुमच्यासारखे वडील मला पण पायजेल...' तिचे भावोत्कट उद्गार ऐकून माझ्या डोळ्यांत टचकन पाणी आलं.

स्वतःला सावरत मी तिची समजूत घातली. 'हे बघ मला लेक नाहीये. एकच मुलगा आहे. तू माझी लेक आहेस असं समज. काय हवं नको, ते मला सांगत जा,' असे म्हणत तिला धीर दिला. ती बरीच भावूक झालेली. तिच्या बोलण्यात निराशा होती. तिला प्रेमाचा, मायेचा उबारा आणि निवारा हवा होता! कधी कधी जाणते-अजाणतेपणी आईवडिलांचं मुलांकडे दुर्लक्ष झालं, त्याचा त्रास व्हायला लागला की, मुलं स्वतःला असुरक्षित समजायला लागतात. त्यांचा भावनिक, मानसिक पातळीवर कोंडमारा होतो. मग अशी मुलं मनातल्या मनात कुढत, चरफडत राहतात. कोणाजवळ मनमोकळं

बोलावं? असा प्रश्न त्यांना सतावत राहतो. सातव्या वर्गातली मनीषा अशाच काहीशा फेजमधून जात होती. त्या प्रसंगानंतर तिच्याबरोबर मी जरा जास्त बोलू लागलो. वरचेवर तिची विचारपूस करू लागलो. तिला छळणारी ती जाणीव हळूहळू दूर होत गेली. आता ती मजजवळ मोकळेपणाने व्यक्त होतेय. अन्न, पाण्याप्रमाणेच मुलांचा स्वीकार होणे ही महत्त्वाची गरज असते, हेच हा प्रसंग अधोरेखित करून गेला. यावर मुलांचे फुलणे वा कोमेजून जाणे बहुतांश अवलंबून असते.

आई-बाप का आवडतात किंवा का आवडत नाहीत? या विषयावर गेल्या काही दिवसांपूर्वी मी मुलांना लिहायला सांगितलं होतं. मुलं ज्या तऱ्हेनं व्यक्त झाली, ते वाचून हे म्हणजे मुलांनी मोठ्यांच्या डोळ्यांत घातलेलं अंजन असल्याची जाणीव मला झाली. अभ्यासावरून सारखे सारखे न छळणारे, न मारणारे, न रागावणारे, गरजेपुरते पैसे देणारे, खेळायला जाऊ देणारे, लाड पुरवणारे आईबाप मुलांना आवडतात, असं साधारणपणे दिसून आलं. आई आवडतेय पण वडील अजिबात आवडत नाहीत, असं लिहिणारी मुलं तुलनेनं जास्त होती. एक बाप म्हणून याचं मला मोठं कोडं पडलं. एका मुलाला बाजूला घेऊन कारणं जाणून घेतली तेव्हा प्रकर्षानं लक्षात असं आलं की, ग्रामीण भागातल्या या बहुतेक 'बाप मंडळीं'ना लहान मुलांच्या भावविश्वाशी काही एक देणघेणं नाहीये. मुलांशी प्रेमानं वागणं, आपुलकीनं जवळ घेणं, अंजारणं, गोंजारणं, कुरवाळणं त्यांना जमतच नाहीये. 'तुमच्यातल्या किती बापांनी मुलांना जवळ घेऊन त्यांच्या गालावरून हळुवार हात फिरवत त्यांना गोंजारलंय? त्यांच्या गालावर ओठ टेकवत छान मुका घेतलाय? त्यांच्या खांद्यावर हात ठेऊन चार पावलं सोबत चाललाय?' असं मी

एके दिवशी मी शाळेतून घरी आलो. घरी येताच माझी छोटी शिवप्रिया दररोज घरात धावत जाऊन पाणी आणून देते. आजही पाणी देऊन हळूच कशी म्हणते,

''पप्पा, मी ना माझ्या छोटया पर्समध्ये तुमचा छोटा फोटो ठेवून दिलाय.''

''का?''

''अहो, तुम्ही मेले ना, मग फोटो बघून रडायला नको का? काय तुम्ही पप्पा असून पण कळत नाय.''

मी विचारात पडलो. थोडा शांत बसलो, आणि म्हणालो,

''अगं पण तू मरायची वाट का बघते? उदया रड!'' तिकडून तिची आई ओरडली,

''काय पण दोघांचे जगावेगळे चाललेले असते नेहमी!''

मी मध्येच डोळे मारत, खुणावत तिला गप्प बस म्हणून इशारा केला आणि बोलू लागलो,

''हां, उदया रड की.''

''अहो, तुम्ही काय उद्या लगेच नाही मरणार. तुमचे केस कुठे पांढरे झालेत?''

मी हसू लागलो.

''अहो खरंच पप्पा! माणूस लगेच नाय मरत. सगळे म्हणजे सगळे एकूण एक केस पांढरे झालेत का मरतात. तुमचे तर हे बघा दोन तीन केस झाले पांढरे आत्ताशी.''

गंमतच झाली. बराच वेळ गप्पा मारून आम्ही आपापली कामे करू लागलो.

दुसऱ्या दिवशी मी मुद्दाम हेअर डाय करत होतो. शिवप्रिया येऊन म्हणाली,

''काय करतात हो पप्पा तुम्ही?''

''केस काळे करतो गं सगळेच.''

''अरे तुम्ही हुशार पप्पा माझे! मम्मी, ए मम्मी! हे बघ गुड आयडिया! माझे पप्पा कधीच मरणार नाहीत कारण माझे पप्पा टॅलेंटेड आहेत. बघ त्यांनी सगळे केस काळे केलेत. बघ ना गं!''

मग आम्ही सगळेच हसायला लागलो. अशी माझी शिवप्रिया. थोडी मोठी झाली की मी तिच्याशी मृत्यूबद्दलही बोलणार आहे.



परवा पुण्याहून घरी येताच शिवप्रियाने एका कागदावर I LOVE FATHER असे लिहिलेले मला दिले. माझ्या डोळ्यांतून दोन थेंब. बहुतेक यालाच जीवन असे नाव असेल.

चेच्या रूध्या गावित

प्राथमिक शिक्षक

जि. प. प्राथमिक शाळा, इंजिवली, जि. रायगड

अनेक ठिकाणी बाप पालकांना विचारलंय. तेव्हा अनेकांना मी ओशाळताना पाहिलंय. त्यांच्या चेहऱ्यावरचे अपराधीपणाचे भाव वाचलेत. याउलट स्वतःच्या अंगभूत उद्धटपणाला, असंवेदनशीलतेला काही बाप लोकं शिस्तीची लेबलं लावताना दिसतात. आपल्याकडं पोरांचे लाडबीड अजिबात चालत नाहीत,' असं ठासून सांगताना त्यांची छाती दोन इंचांनी फुगते! मुलं आपल्या कशी धाकात आहेत, असा गमजा ते मिरवत राहतात!

मुलं स्पर्शाची भुकेलेली असतात, ही गोष्ट अनेक पालकांच्या गावी नाहीये. या पालकांच्या दृष्टीनं मूल ही व्यक्ती फारशा गांभीर्यानं घ्यायची गोष्टच नाहीये जणू! ही जबाबदारी त्यांनी आयांवर आणि आजी-आजोबांवर सोपवलीय! ग्रामीण भागातल्या शाळांमधल्या पालक मेळाव्यांना बापांपेक्षा आया जास्त संख्येनं येतात. एकूणच जाणते-अजाणतेपणात होत असलेल्या गोष्टींमुळं आईपेक्षा बाप मुलांना भावनिकदृष्ट्या खूपच दूरचा वाटत राहतो. हा दुरावा कमी होण्यापेक्षा पुढं मुलं मोठी होतात, तसातसा वाढतच जातो. काही मागायचं असलं तरी मुलं आईचं 'माध्यम' वापरून बापाला सांगतात. अर्थात सगळ्या बापांना एका रंगात रंगवता येत नाही. काही सन्माननीय अपवाद जरूर आहेत उदा. बेच्या गावितचंच उदाहरण पाहा ना.

मनीषाच्या मनातून पोखरलं जाण्याकडे अशा स्थितीतून जाणाऱ्या मुलांच्या मानसिकतेचं प्रातिनिधिक उदाहरण म्हणून बघता येईल. तिनं मनातली सल बोलून दाखवली. बाकी बऱ्याच जणी मनातलं मनात घेऊन जगत आहेत, इतकंच.

यानिमित्तानं अजून एक गोष्ट ठळकपणानं समोर आली. ती ही की तिघं-चौघं मुलं वजा केली तर बहुतेकांचे बाप कुठलं ना कुठलं व्यसन करणारे होते. दारूपासून, तंबाखू, विडी अशा व्यसनांच्या आहारी गेलेले, पत्ते खेळून पैसे बरबाद करणारे, घरच्या लोकांना उठसूठ त्रास देणारे बाप मुलांना अजिबात आवडत नसल्याचं दिसलं. 'माझा बाप भारी आहे. मला माझ्या बापाचा अभिमान वाटतो,' असं ठामपणानं सांगायला मुलं पुढं येत नाहीत, यात बाप मंडळींनी आत्मपरीक्षण करण्यासारखं आहे. आयांना वात्सल्याचं नैसर्गिक वरदान लाभलंय. मुलं म्हणजे त्यांच्यासाठी तळहातावरचा फोड असतो. काळजाचा तुकडा असतो. बापाच्या डोक्याला डोकं लावण्याच्या फंदात न पडता सारं काही सोसत ग्रामीण स्त्रिया पोरांची सावली बनून राहतात. म्हणूनच मग मनीषासारख्या 'जाणत्या' मुली बापाच्या शोधात सैरभैर होत जगत राहतात. भावनिक, मानसिकदृष्ट्या ही मुलं कुपोषित राहू नयेत, यासाठी शिक्षकांनी अशा मुलांना शिकवतानाच त्यांना ओळखणं आणि त्यांचं पालकत्व निभावणं फार फार आवश्यक वाटतं.

भाऊसाहेब चासकर

bhauchaskar@gmail.com

9422855151

■ ■ ■

पत्रास कारण की...

व्यक्त होण्यासाठी पत्रलेखन हे खूप प्रभावी माध्यम आहे. वर्गात बाबांना पत्र लिहायला सांगितले तेव्हा बऱ्याच मुलांनी सहल, नव्याने मिळालेले ज्ञान, आमचे सर हे विषय हाताळले. पण राहुलने मात्र बाबांशी जे सहज बोलता येत नाही ते पत्रातून मांडणे पसंत केले.

राहुल सातवीत असला तरी गेल्या ५-६ महिन्यांतच लिहायला शिकला आहे. राहुलची पत्रात मांडलेली व्यथा प्रातिनिधिक तरीही क्लेशकारक. मात्र राहुलला हे लिहिण्यात जराही संकोच वाटला नाही हे मी शाळेचे यश मानतो.

वाल्मिक चव्हाण

प्राथमिक शिक्षक,

जि. प. शाळा गंगाम्हाळुंगी, जि.नाशिक

valmikchavan76@gmail.com

9422753158


शिक्षिय आईवडीलांना इयत्ता सातवी
साष्टांग नमस्कार वि वि
पप्पा तुम्ही दारू खुप पिता दारू
पिऊ पिऊ नका आणि दारू पिऊन घरातल्यांना
त्रास देऊ नका आणि आणि स्वतःची काळजी घ्या
आणि शेतीकडे लक्ष द्या दारू
पिऊ नका
तुमचा मुलगा राहुल
नमस्कार

बालशिक्षणाबद्दल काही नवे

नीलिमा गोखले

पालक हे मुलांचे पहिले शिक्षक असतात आणि घर ही पहिली शाळा असे आपण नेहमी म्हणतो. आणि खरेच आहे ते. मोठ्यांबरोबर घरात वावरताना मूल शिकत असते. आजूबाजूच्या माणसांचे निरीक्षण करीत असते. घरात व परिसरात बोललेली भाषा ऐकत असते. घरातील माणसे एकमेकांशी आणि बाहेरच्यांशी कशी वागतात हे पहात असते. निरीक्षणातून आणि सहभागातून मूल न शिकवताही शिकत असते. हे शिकणे इतके सहज असते की मोठ्यांना ते होते आहे याचेही विस्मरण होते. या सदरामधून पालकांना याचीच आठवण करून द्यायची आहे. आणि नव्या संशोधनाच्या पार्श्वभूमीवर पालक म्हणून आपली जबाबदारी नव्याने समजून घ्यायची आहे.

गेल्या चार साडेचार दशकांमधील मज्जाविज्ञानातील संशोधनाने असे सिद्ध केले आहे की मोठेपणी बालक काय शिकणार आणि काय बनणार हे त्याच्या सुरुवातीच्या वर्षांमधील (० ते ८) विकासावर अवलंबून असते. त्यामुळेच बालपणीचा हा काळ अत्यंत महत्त्वाचा आहे व त्या काळात बालकाला मिळणारे अनुभव कळीचे ठरतात. 'आम्ही नाही का वाढलो, चांगले शिकलो', असे म्हणून आपल्या मुलांचा विकास आणि शिकणे नशिबावर सोडून देता कामा नये.

अनेक वर्षांच्या मेंदूवरच्या संशोधनावरून आज आपल्याला हे माहीत झाले आहे की बाल्यावस्थेतील अनुभवांमुळे बालकाच्या मेंदूची जडणघडणच बदलते. गुणसूत्रांमुळे व्यक्तिमत्वाच्या जडण–घडणीचा पाया घातला जातो हे खरेच आहे. परंतु भविष्यातील सर्व शिकण्याच्या प्रक्रियांचे अधिष्ठान मात्र मुलाला बाल्यावस्थेत येणाऱ्या अनुभवांमुळे तयार होते. हे अधिष्ठान मजबूत असेल व मुले चांगली शिकती होतील की हे अधिष्ठान कमकुवतच राहील व मुले शाळाबाह्य होतील हे बाल्यावस्थेतील अनुभवांवर अवलंबून असते. मेंदूची तुलना एखाद्या घराशी करता येईल. सुरुवातीला भक्कम पाया बनला तरच त्यावर पुढचा सगळा डोलारा उभा राहतो. म्हणून लहान मुलांचे पालक व शिक्षक यांनी काही गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत.

अगदी लहान मुलाच्या मेंदूतील अब्जावधी चेतापेशी सतत एकमेकींकडे विद्युत लहरींच्या रुपात संदेश पाठवीत असतात. या संदेशांमुळे चेतापेशी एकमेकींशी जोडल्या जातात (connections) आणि या जोडण्यांमधून अनेक सर्किट्स तयार होतात. ही सर्किट्स म्हणजेच मेंदूच्या बांधणीचा किंवा आर्किटेक्चरचा पाया होय. अशा जोडण्या आणि त्यामुळे तयार होणारी सर्किट्स ही बाल वयात अत्यंत वेगाने वाढत असतात. वारंवार वापरल्या जाणाऱ्या जोडण्या मजबूत होतात तर क्वचितच वापरल्या जाणाऱ्या जोडण्या हळूहळू कमकुवत होत अखेर नाहीशा होतात. कोणत्या जोडण्या आणि सर्किट्स अधिक वापरली जाणार हे ठरवण्यात बालकांच्या सभोवतालचे वातावरण आणि त्यांना येणारे अनुभव महत्त्वाची भूमिका बजावतात.

मेंदूतील सर्किट्स

उदाहरणार्थ– ज्या मुलांच्या कुटुंबातील व्यक्ती, विशेषत: आई–वडील स्वत: वाचन लेखन करतात व मुलांनाही त्यात सहभागी करून घेतात, त्या मुलांना लेखन वाचनात सहज गोडी निर्माण होते. किंवा ज्या घरांमधे मुलांना सातत्याने संगीत ऐकावयास मिळते किंवा इतर एखाद्या कलेचे अनुभव मिळतात त्याच्याशी संबंधित जोडण्या मुलांच्या मेंदूमधे तयार होऊन मजबूत होऊ लागतात. हे लक्षात घेऊन मुलांच्या विकासासाठी, त्यांनी अनेक नवीन गोष्टी शिकाव्यात, कला–कौशल्ये आत्मसात करावीत यासाठी त्यांना विविध अनुभव हेतुपूर्वक उपलब्ध करून देणे व प्रौढांनी त्यात योग्य असा सहभाग घेणे गरजेचे आहे.

भावनिक विकास हा इतर सर्व म्हणजे शारीरिक, भाषिक व

बोधात्मक विकासासाठी पायाभूत महत्त्वाचा आहे. सकारात्मक व उत्तम भावनिक विकासासाठी मुलांना संवेदनशील व्यक्ती व तणावमुक्त वातावरण आवश्यक असते. जेव्हा मुले ताण अनुभवतात तेव्हा त्यांच्या शरीरात विशिष्ट भय संप्रेरके निर्माण होतात. त्यामुळे ह्रदयाची स्पंदने वाढतात, रक्त दाब वाढतो. या संप्रेरकांमुळे मेंदूला सावधानतेचा इशारा मिळतो आणि शरीर पळून जाण्यासाठी किंवा मुकाबला करण्यासाठी तयार होते. परंतु त्यामुळे मेंदूतील शिकण्याच्या, विचार करण्याच्या केंद्रांशी संपर्क करणाऱ्या जोडण्यांचा वेग मंदावतो. त्यामुळे त्या काळापुरती मुलाची शिकण्याची प्रक्रिया मंदावते किंवा थांबते. मूल सतत ताणाखाली असेल तर वर वर पाहता शरीरावर त्याचा काही परिणाम दिसून येत नाही. परंतु मेंदूमधील विकसित होणाऱ्या प्रणालींवर मात्र अनुचित परिणाम होत असतो ज्यामुळे मुलांची शिकण्याची प्रक्रिया बंद पडू शकते.

मुलांना जेव्हा त्यांच्या गरजा पूर्ण करणारे, प्रेमळ व स्थिर वातावरण मिळते तेव्हा मुलांचा ताण कमी होतो. मोठ्यांची जबाबदारी म्हणजे मुलांना असे वातावरण मिळवून देणे. पण म्हणजे पालकांनी नक्की काय करायचे? फार वेळ रडायला न लावता लहान बालकांच्या भूक, झोप, शी-शू अशा प्राथमिक गरजा पूर्ण करणे, त्यांच्याशी मृदू आवाजात वेळात वेळ काढून बोलणे, वारंवार जवळ घेणे, माया करणे, मुलांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकणे, त्यांच्या चुकांवर लक्ष केंद्रित करून त्यांना कठोर शिक्षा करण्या ऐवजी त्यांना समजेल असे नीट समजावून सांगणे, मुलांना कौटुंबिक मारहाणीसारखी हिंसक दृश्ये व भांडणांचा आवाज किंवा यासारखेच इतर नकारात्मक अनुभव यापासून दूर ठेवणे यातून मुलांवरचा ताण कमी करता येऊ शकतो. सकारात्मक अनुभवांमधून मुलांची स्वप्रतिमा सकारात्मक बनून त्यांचा आत्मविश्वास वाढतो. मुले इतरांचे ऐकून घेऊन स्वत: विचार करून वागायला शिकतात. पालक व कुटुंबातील इतर प्रौढांबरोबरील आंतरक्रियांमधूनच भावनिक, सामाजिक व वैचारिक विकासासाठी आवश्यक त्या जोडण्या मेंदूमधे बनतात, बळकट होतात व त्यामुळे स्वभावाची, व्यक्तिमत्वाची घडणही बनते. हे लक्षात घेऊन मुलांबरोबर सकारात्मक वागणे व त्यांच्या विकासात अर्थपूर्णरित्या सहभागी होणे हे पालक म्हणून आपण करणे आवश्यकच आहे.

यामागचे विज्ञान अधिक स्पष्ट होण्यासाठी हारवर्ड विद्यापीठाने बनवलेली ही छोटी व्हीडिओ सीरीज उपयुक्त ठरू शकेल.

https://www.youtube.com/playlist?list=PL0DB506DEF92B6347

या लेखासाठी वापरलेले छायाचित्र याच सीरीज मधील Experiences Build Brain Architecture या व्हीडिओतून घेतले आहे.

नीलिमा गोखले
neelima.gokhale@gmail.com
9823053272

■ ■ ■

रिया, इयत्ता पहिली, कमला निंबकर बालभवन,फलटण



शिकतं घर आणि बाबा

नीला आपटे

'घर शाळेत आणि शाळा घरात शिरली पाहिजे. आई-बाबांनी शिक्षक आणि शिक्षकांनी आई-बाबा बनलं पाहिजे,' हा विनोबांचा शिक्षणविषयक विचार मला खूप आवडतो. शिक्षण अर्थपूर्ण आणि आनंददायी बनवण्यासाठी हे खूपच उपयुक्त ठरू शकतं. माझे आई-बाबा दोघंही शाळेत शिक्षक होते. पालक म्हणून भूमिका बजावताना त्यांच्यातलं शिक्षकपण घरीसुद्धा जागं असायचं हे मी पाहिलेलं आहे, अनुभवलेलं आहे.

माझे बाबा विज्ञान शिक्षक होते. आमचं घर म्हणजे एक प्रयोगशाळाच झाली होती. आम्ही गमतीनं त्याला खटपट घर म्हणायचो. जुन्या बाजारात जाऊन लोकांना टाकाऊ वाटणाऱ्या गोष्टी विकत घ्यायच्या आणि घरी येऊन आपले विद्यार्थी आणि आम्ही तीन बहिणी यांना सोबत घेऊन काही प्रयोग करायचे, काहीतरी शक्कल लढवून त्या टाकाऊ वस्तूंपासून नवीन उपयोगी वस्तू तयार करायच्या असा त्यांना छंदच होता. मुलगी म्हणून कोणत्या कामापासून त्यांनी मला दूर ठेवलेलं आठवत नाही. म्हणूनच सुतारकामाची जवळपास सगळी अवजारं मला लहानपणापासूनच व्यवस्थित वापरायला येऊ लागली. गणित आणि विज्ञानाचे अनेक नियम श्लोकांसारखे छंदबद्ध करून त्यांनी शिकवलेले मला आठवतात. पत्त्यांच्या एका जादूचं 'आएतीतेसाबा चाअसद दोनपा' (आ-आठ - ए-एक - ती-तीन - ते म्हणजे तेरा गुण असणारा राजा, सा-सात- ...असे एकाच रंगाचे १३ पत्ते गुणानुसार आठ्ठी-एक्का-तिर्री-राजा-सत्ती-राणी-चव्वी-गुलाम-छक्की- दश्शी-दुर्री-नश्शी-पंची असे वरून खालपर्यंत अनुक्रमे लावा आणि मग पहिले पान तळाशी ठेवा, दुसरे उलगडा, तिसरे पुन्हा तळाशी ठेवून चौथे उलगडा... अशा पद्धतीने एक आड एक पाने उलगडत जा, बघा काय गंमत होते ती) हे सुद्धा असंच एक सूत्र.

दरवर्षी दिवाळीचा आकाशकंदील आम्ही घरीच तयार करायचो, शाळेचं स्नेहसंमेलन आलं की नाच, नाटक, गाणी यांचा सरावही बऱ्याचदा आमच्या घरात व्हायचा. असं खूप काही करून पाहण्याचा आणि करत करत शिकण्याचा अवकाश देणाऱ्या घरात माझं बालपण गेलं. कुणी म्हणेल, आई-बाबा मुळात शिक्षक असल्याने इतकं काही शिकवू शकले. सर्वसामान्य घरात हे कसं शक्य आहे? पण मला वाटतं की पालक काय शिकवू शकतात यापेक्षा ते मुलांना काही गोष्टी प्रत्यक्ष करून पाहण्याचा अवकाश किती देतात, त्यासाठी प्रोत्साहन किती देतात, हे महत्त्वाचं असतं. अगदी काही शिकविण्यासाठी पालकांनी एखाद्या विषयात तज्ज्ञ असायला हवं असं नाही. पालकही अनेकदा मुलांकडून काही शिकू शकतात किंवा दोघे मिळून एखादी नवीन गोष्ट करून पाहू शकतात.

अनेक घरांमध्ये बाबा कामावरून दमून आलेले, आई घरकामाचा गाडा हाकून दमलेली, अशा परिस्थितीत विश्रांतीच्या वेळेत मुले घरात बसून काही खटपट करू लागली तर त्याची कटकट वाटते, त्यामुळे होणारा पसारा नकोसा वाटतो. काहीतरी नवीन पाहण्यासाठी, आणण्यासाठी मुलांची सोबत करावी लागते त्याचा मोठा व्याप वाटतो. त्यामुळे पालक मुलांना काही करून पाहणं आणि शिकणं यापासून परावृत्त करत राहातात. यामुळे मुलांचाही करून पाहण्याचा, शिकण्याचा ओसंडून वाहणारा उत्साह मावळून जातो आणि घर शिकतं होण्यापासून वंचित राहातं.

काही घरांमध्ये आई घरी बसून मुलांचा अभ्यास घेते, त्यांच्याशी गप्पा मारते, फिरायला घेऊन जाते, इतर काही रोजची कामंही मुलांकडून करून घेते आणि बाबा रात्री उशीरा घरी परततात आणि आल्यानंतर मुलांनी केलेल्या कामाचा फक्त हिशेब मागतात... बाबागिरीच्या आविर्भावात. मुलं सराईतपणे 'हो केलं' असं उत्तर देतात. कधीकधी खोटंही...पण उगाच आरडाओरडा नको म्हणून आईही काही बोलत नाही. असे प्रसंग पाहिले की वाटतं, बाबांनी नुसता कामाचा जमा-खर्च न मागता, स्वतः मुलांबरोबर काही करून, अभ्यास-वाचन घेत, शक्य होईल तेव्हा मुलांसोबत आनंदाने अर्थपूर्ण वेळ घालवला तर...

खरं तर पारंपरिक भूमिकेनुसार अर्थसंपादन करणं, चरितार्थ सांभाळणं, मुलांच्या व इतर कुटुंबियांच्या गरजेनुसार त्यांना वस्तू व सेवा मिळवून देणं अशी बाबापालकाची कर्तव्ये मानली जातात. परंतु शिकत्या घरासाठी याच्या पलिकडच्याही काही गोष्टी बाबांनी करणं आवश्यक आहे. मुलांसोबत गप्पा मारणं, हसणं, खेळणं, मुलांना आपल्या बरोबर फिरायला घेऊन जाणं, मुलांच्या अभ्यास-उपक्रमात सहभागी होणं, प्रसंगी त्यांना शिकवणं, अशा अनेक गोष्टी बाबांनी जाणीवपूर्वक करायला हव्यात.

एकदा आम्ही काही मैत्रिणी गप्पा मारत बसलो होतो. आम्हा सर्वांचंच एका गोष्टीत एकमत झालं. ती म्हणजे, बाबापालक स्वतःला जाणीवपूर्वक काही गोष्टींपासून दूर ठेवतात. मुलांशी छोट्या छोट्या विषयांवर संवाद साधत राहणं हे आपसात विश्वास, आत्मीयता निर्माण होण्यासाठी खूप महत्त्वाचं असतं. नुसता मुलांच्या सान्निध्यात जास्तीत जास्त वेळ घालवल्यानेही जवळीक निर्माण होते. बाबांचा कल मात्र हे सगळं टाळण्याकडे जास्त असतो. तर आई पालकांना या सगळ्यांची नितांत आवश्यकता वाटत असते आणि अगदी जाणीवपूर्वक त्या ते करत असतात. नोकरी करणारी बाई

आपल्याला सुट्टी असेल तर बाळाला पाळणाघरात न ठेवता जास्तीत जास्त वेळ आपल्या सोबत ठेवण्याचा प्रयत्न करते. पण बाबांना सुट्टी असेल तर असं होत नाही. पण मग तेच बाबा मुलं मोठी झाल्यावर मला ती/ तो फारसं काही सांगत नाही, आईचं आणि तिचं/ त्याचं चांगलं जमतं असं काहीशा खेदानं म्हणतात.

बाबा आपल्या मुलांशी कसे वागतात, मुलांसोबत काय करतात अशा थेट मुलांशी संबंध असणाऱ्या गोष्टींबरोबरच बाबांच्या संदर्भातील इतर अनेक गोष्टीसुद्धा घराच्या शिकतेपणावर परिणाम करणाऱ्या असतात. औपचारिक विषयांचं शिक्षणच काही फक्त शिक्षण नसतं हे आपण एकदा मान्य केलं की मग जीवन व्यवहार – नैतिक मूल्ये अशा विषयांतील धडे मुले बऱ्याच अंशी घरातच शिकतात हे आपल्या लक्षात येतं. बाबांनी आईला समानतेनं वागवणं, तिच्या म्हणण्याला, विचारांना किंमत देणं, आई करत असलेल्या घरच्या कामांना प्रतिष्ठा देणं, नोकरी करत नसली तरी तिला पुरेसं आर्थिक स्वातंत्र्य देणं, या गोष्टीही मुलांच्या जडणघडणीत महत्त्वाच्या ठरतात. खऱ्या अर्थानं घर शिकतं बनण्यासाठी हेही आवश्यक आहे.

नीला आपटे
apte_neela@yahoo.co.in
9405924227

बाबा झोरो पान ७ वरून

नव्हती. बालिश उत्साहात पिस्तो धावतच कुंपणापाशी गेला. गेटला नाक लावून आत वाकून पाहू लागला. झोरो दूर निलगिरीच्या झाडापाशीच उभा होता. तेवढ्यात राणी कुत्री खुळ-खुळ आवाज करीत भुंकत आली. पिस्तोने घाबरून पायात शेपूट घालून सूं बाल्या केला. दूरवर भराव्यावर जाऊन तो थांबला. झोरोने शांतपणे निलगिरीवर एक पाय वर केला आणि पुढे जाऊन तो राणीच्या नाकाला नाक लावून आला. कदाचित नव्या अनोळखी ठिकाणी जाण्याची घाई करू नये असे तो पिस्तोला सांगू पाहत होता.

मघाच्या अनुभवाने बावरलेला पिस्तो आमच्या बरोबर येत होता. झोरो पुढे दुडक्या चालीने चालत होता. घर आता जवळ आले. घराकडे जाण्याचा रस्ता झाडीत लपला होता. झोरो तेथपर्यंत जाऊन थांबला व मागे बघू लागला. त्यासरशी पिस्तो दुडू दुडू धावत आपल्या बाबांकडे गेला. बाबांच्या मागच्या पायांना घासत घासत त्यांच्या मागोमाग भराव्यावरून खाली उतरला. दोघेही आमच्या आधी घरी हजर होते. २० मिनिटांच्या कालावधीत फिरायला जाताना कसे वागायचे याची शिकवणी झाली होती.

प्राण्यांमध्ये साधारणतः मोठे नर छोट्या नर पिलांना मारून टाकतात. पिस्तो फार छोटा नव्हता. तरीही आम्हाला जरा काळजीच वाटत होती. पण तापट झोरोने ज्या संयमाने पिस्तोचे बाबापण स्वीकारले आणि त्यास वागणुकीचे नियम शिकवले ते खरोखरच आश्चर्यकारक होते!

– मंजिरी निंबकर
manjunimbkar@gmail.com
9822040586



Published & Posted on 16 January 2015
Posted at Marketyard PSO, Pune 411037.
on 16th of each month

RNI No. MAH MAR 2001/4166
Registered No. PCW/ 026/ 2015-2017

शहाणी वेबपणे

मॉर्निंग जॅम विथ माय लिल् मॅन

मध्यंतरी इंटरनेटवर एक व्हीडिओ प्रचंड लोकप्रिय झाला. याला वेबभाषेमध्ये 'गॉन व्हायरल' असं म्हणतात. एखाद्या विषाणूचा संसर्ग व्हावा तसे हे काही व्हीडिओ सोशल मीडियावर पसरतात आणि लोकांच्या मनांवर कब्जा करतात.

आपल्या व्हीडिओचं असं काही होईल असं तो अपलोड करणाऱ्या डॉमिनिक हुंग्रच्या ध्यानीमनीदेखील नव्हतं. काही मित्रमंडळी आणि कुटुंबातल्या लोकांचं मनोरंजन व्हावं इतक्याच काय त्या हेतूनं त्यानं तो फेसबुकवर टाकला आणि पाचच दिवसात ५८,३९१ जणांनी तो शेअर केला. पुढच्या २ महिन्यांत जवळजवळ १० लाख लोकांनी तो यूट्यूबवर पाहिला.

असं काय होतं त्या व्हीडिओमध्ये ? जगावेगळं काहीच नाही. २ मिनिटांच्या या व्हीडिओमध्ये वीसेक महिन्यांचा निकोसेक आपल्या बाबांबरोबर सकाळचा व्यायाम (खरंतर नाचच) करताना दिसतो. निकोसेकच्या चेहऱ्यावरचा निखळ आनंद जगभरातल्या लोकांना भावला असावा आणि त्याला तशी संधी आणि मोकळीक देणाऱ्या डॉमिनिकचं कौतुक वाटलं असावं. एखादं आनंदी, निरोगी आणि हसतं-खेळतं मूल पाहण्यासारखं दुसरं सुख नाही आणि मूल असं असण्यात त्याच्या आजूबाजूच्या प्रौढांचा खूपच मोठा वाटा असतो.

छोट्या मुलांसाठी शिकणं ही अतिशय नैसर्गिक प्रक्रिया असते. त्यांच्या प्रत्येक अनुभवातून ती काही न काही तरी उचलतातच. छोटा निकोसेकही बाबांचं अनुकरण करण्याचा पूर्ण प्रयत्न करतो. बाबा हिपहॉप प्रकारचा नाच करत आहेत. त्यांच्या हालचालीत एक प्रकारची सफाई, सौंदर्य आहे. निकोसेक नुसत्याच उड्या मारत खिदळतो आहे आणि आपल्या टेडी बेअरला उलटं-पालटं करून आपल्याला जे जमलं नाही ते त्याच्याकडून करवतो आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे निकोसेकनी काय करावं किंवा कशा प्रकारे नाचावं याबद्दलची कोणतीच अपेक्षा त्याच्या बाबांनी ठेवलेली नाही. एकत्र मजा करणे एवढाच हेतू आहे. असं मोकळं आणि तणावरहित वातावरण मुलांच्या भावनिक आणि बौद्धिक विकासासाठी अत्यावश्यक असतं.

निकोसेक या वेळात कायकाय शिकतोय याचा विचार केला तर मोठी यादीच तयार होईल. आपल्या शारीरिक हालचालींबद्दल आत्मविश्वास, हिपहॉप नाचाच्या पद्धतीनुसार आपली पाळी येईपर्यंत वाट पाहणं, बाबांशी संवाद करण्यातून होणारा भाषाविकास, बाबा काय करत आहेत याचं बारीक निरीक्षण व त्यानंतर आपण काय करायचं याचा विचार, नवीन गोष्टी शिकण्याबद्दलचा सकारात्मक दृष्टिकोन...आणि खूप काही.

आपल्या लहानग्यासोबत असा छान वेळ घालवून खरं तर हे बाबा त्याच्या आयुष्यभराच्या शिकण्याचा भक्कम पायाच घालत आहेत असं म्हणायला हरकत नाही.

https://www.youtube.com/watch?v=nYW6T-bwGCc

नीलिमा गोखले
neelima.gokhale@gmail.com
9823053272

मधुरा राजवंशी
rmadhuraa@gmail.com
8275369702